आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३० नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रातली विधानसभा निवडणुकीची प्रक्रीया पूर्णपणे पारदर्शक होती, तरी काँग्रेसने उपस्थित केलेल्या वाजवी मुद्यांबाबत चर्चेची तयारी असल्याचं  केंद्रीय निवडणूक आयोगाचं प्रतिपादन

- महायुती सरकारचा शपथविधी येत्या ५ डिसेंबरला प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार.

- सर्पदंश आणि सर्पदंशामुळे होणारे मृत्यू, यांचा समावेश आरोग्य कायद्यातल्या अधिसूचीत करावा असे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश

**आणि**

- पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन, सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

महाराष्ट्रातली विधानसभा निवडणुकीची प्रक्रीया पूर्णपणे पारदर्शक होती, तरीही काँग्रेसने याबाबत उपस्थित केलेल्या वाजवी मुद्यांचा विचार केला जाईल असं केंद्रीय निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. विधानसभा निवडणुकीत, निवडणूक आयोगाच्या यंत्रणेबाबत शंका उपस्थित करणारं पत्र काँग्रेसने निवडणूक आयोगाला लिहीलं होतं. त्यावर अंतरिम उत्तर देताना आयोगाने म्हटलंय की मतदार याद्यांचं **परिरक्षण** करताना सर्व राजकीय पक्षांचा सहभाग होता. मतदानाच्या  टक्केवारीत काहीही विसंगती नाही, असं आयोगाने स्पष्ट केलं असून संबंधित माहिती, मतदान केंद्रांच्या तपशिलासह सर्व उमेदवारांना उपलब्ध होती.

आणि ती पडताळून पाहणंही शक्य होतं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंतची आकडेवारी आणि अंतिम आकडेवारी यातली तफावत केवळ डेटा गोळा करण्यात लागलेल्या विलंबामुळे असून, त्या दृष्टीनं आयोगाने रात्री पावणेबारा वाजता खुलासेवार प्रसिद्धीपत्रक जारी केलं होतं. याखेरीज कायद्याच्या चौकटीत उपस्थित केलेल्या मुद्यांवर चर्चा करायची असल्यास काँग्रेसच्या प्रतिनिधी मंडळाने येत्या मंगळवारी ३ डिसेंबरला यावं, असं आयोगाने सांगितलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात महायुती सरकारचा शपथविधी येत्या ५ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता मुंबईत आझाद मैदानावर होणार आहे.भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या सोहळ्याला उपस्थित राहणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महायुती सरकारचा शपविधी ५ डिसेंबरला होणार असून मुख्यमंत्री भाजपाचा होईल, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज पुण्यात वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे उपमुख्यमंत्री असतील असं पवार म्हणाले. विरोधकांचा निवडणुकीत पराभव झाल्यामुळे त्याचं खापर मतदान यंत्रावर फोडलं जात आहे, अशी टीका करत मतदान यंत्राबद्दल तक्रार करणं योग्य नाही असं पवार म्हणाले. मतदान यंत्रात घोटाळा झाला असेल तर तो सिद्ध करून दाखवला पाहिजे असंही पवार म्हणाले.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसंदर्भात विविध गैरप्रकार झाल्याचा आरोप करत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी २८ नोव्हेंबर रोजी पुण्यात सुरु केलेल्या आत्मक्लेश उपोषणाची आज सांगता झाली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पाणी पिऊन त्यांनी उपोषण सोडलं. ज्येष्ठ नेते **शरद पवार** यांनीही

बाबा आढाव यांच्या उपोषणस्थळी भेट देऊन वार्ताहरांशी संवाद साधला. उपमुख्यमंत्री **अजित पवार** यांनी आढाव यांच्या उपोषणस्थळी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ओडिशाच्या भुवनेश्वर इथं पोलिस महासंचालक आणि पोलिस महानिरीक्षकांच्या अखिल भारतीय परिषदेत सहभागी होत आहेत. काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन झालं.

सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे पोलिस महासंचालक, तसंच केंद्रीय राखीव पोलिस बल, रॉ, राष्ट्रीय सुरक्षा दल - एनएसजी, गुप्तचर विभाग आणि विशेष सुरक्षा दल - एसपीजीचे प्रमुख या परिषदेला  उपस्थित आहेत. या परिषदेत अंतर्गत सुरक्षा, सायबर क्राईम, नक्षलवाद, कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांमुळे निर्माण होणारी आव्हानं, ड्रोनचे नवीन धोके आणि दहशतवादाचा सामना यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. या परिषदेत विशिष्ट सेवेसाठीची राष्ट्रपती पोलिस पदकंही प्रदान करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

इटलीच्या नौदलात ९३ वर्षांपासून कार्यरत असलेल्या '**अमेरिगो वेस्पूची'** या प्रशिक्षण नौकेचं मुंबईत आगमन हे भारत आणि इटली या दोन देशांदरम्यानच्या दृढ मैत्रीचं प्रतीक असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय बंदर, जहाज वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी केलं आहे. मुंबई बंदर प्राधिकरणाच्या इंदिरा डॉक इथं 'अमेरिगो वेस्पूची' या नौकेची पाहणी सोनोवाल यांनी केली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. अमेरिगो वेस्पूची ही नौका जग प्रदक्षिणेसाठी निघाली आहे. पुढच्या प्रवासासाठी या नौकेवरच्या चमूला सोनोवाल यांनी शुभेच्छा दिल्या. इटलीच्या नौदलाचे व्हाइस ॲडमिरल अँटोनिओ नाटाले आणि इतर यावेळी उपस्थित होते. या निमित्ताने इटलीची कला आणि संस्कृतीची झलक दाखवणारं एक प्रदर्शनही या

नौकेजवळ भरवण्यात आलं आहे. २८ सप्टेंबर रोजी मुंबईत दाखल झालेली ही नौका ३ डिसेंबरपर्यंत इथं राहील, त्यानंतर ती पुढच्या प्रवासासाठी रवाना होणार आहे.

<><><><><>

सर्पदंश आणि सर्पदंशामुळे होणारे मृत्यू, यांना राज्य सार्वजनिक आरोग्य कायद्यातल्या तरतुदीनुसार, नोटिफायबल डिसीज म्हणजेच आजारांच्या अधिसूचिमध्ये, समाविष्ट करावं, असं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सर्व राज्यसरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांना, सांगितलं आहे. विशेषतः शेतकरी आणि आदिवासींमध्ये सर्पदंशामुळे  मृत्यू, विकृती आणि अपंगत्व येऊ शकतं, वर्ष २०३०पर्यंत सर्पदंशामुळे मृत्यूचं प्रमाण निम्म्यानं कमी करण्याचं सरकारचं  उद्दिष्ट आहे, त्यामुळे वर्ष २०३० पर्यंत सर्पदंश प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी राष्ट्रीय कृती आराखडा बनवण्यात आला आहे, असं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना पाठवलेल्या  पत्रात म्हटलं आहे.

<><><><><>

कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाची २३६ वी बैठक आज नवी दिल्लीत झाली. केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय  बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या केंद्रीकृत संकलनासाठी बँकांच्या निवडीसाठीचे  निकष सुलभ करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. नवीन निकषांमध्ये रिझर्व बँकेकडे सूचीबद्ध असलेल्या सर्व एजन्सी बँकांचा समावेश असेल. आरबीआय एजन्सी बँक नसलेल्या परंतु एकूण कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या संकलनामध्ये  किमान २ दशांश टक्के योगदान  असलेल्या इतर शेड्यूल्ड वाणिज्यिक बँकांच्या निवडीलाही विश्वस्त मंडळाने मान्यता दिली.  हा निकष पूर्वी अर्धा टक्के योगदानाचा होता.

<><><><><>

भारत आणि सिंगापूरच्या सैन्याचा नाशिकजवळ देवळाली इथं सुरू असलेला तीन दिवसीय संयुक्त सराव आज संपला. सिंगापूर दारुगोळा विभागाच्या १८२ सैनिकांनी तर भारतीय सैन्यातल्या दारुगोळा रेजिमेंटच्या ११४ सैनिकांनी या सरावात सहभाग घेतला. दोन्ही सैन्यांच्या तोफखान्यांद्वारे संयुक्त शस्त्र नियोजन, अद्ययावत शस्त्रास्त्रांच्या वापराची प्रात्यक्षिकं या सरावात सादर करण्यात आली. उभय देशांचे उच्चाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

दुबईत सुरू असलेल्या १९ वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानबरोबरचा सामना भारताचा ४३ धावांनी गमावला. प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानच्या शाहजाब खान आणि उस्मान खान यांच्या जोडीनं ५० षटकात ७ गडी बाद करत २८१ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल भारताचा डाव ४८ षटकात २३७ धावाच करु शकला. भारताच्या निखिल कुमारनं सर्वाधिक ६७ धावा केल्या.

**<><><><><>**

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेच्या पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन या  भारताचे अव्वल खेळाडूंनी  अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पी.व्ही. सिंधूने उपान्त्य फेरीत उन्नती हुडा हिला अवघ्या ३५ मिनिटांत २१- १२, २१ - ९ असं हरवलं. अंतिम फेरीत तिची लढत थायलँडच्या लालि नरत चायवान या चीन की लुओ यू वू हिच्याशी होणार आहे.

पुरुष गटाच्या उपान्त्य फेरीत लक्ष्य सेन ने जपानच्या शोगो ओगावा याचा २१ -८ आणि २१ – १४ अशा गुणफरकाने पराभव केला. अंतिम फेरीत आता त्याचा सामना सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेह याच्याबरोबर होणार आहे. तेहने उपान्त्य फेरीत भारताच्या प्रियांशु राजावतला हरवलं.

ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद ही जोडी त्यांनी थायलंडच्या बेनियपा एमसार्ड आणि नुन्ताकाम एमसार्ड जोडीला हरवून महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचली आहे.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रेस्टो यांनी चीनच्या झोऊ झी होंग आणि यांग जिया यी जोडीवर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला.

**<><><><>**

बंगालच्या उपसागरात तयार झालेलं फेंजल चक्रीवादळ ताशी १० किलोमीटर वेगाने वायव्येकडे सरकत असून महाबलिपुरमपासून ५० किलोमीटर अंतरावर पोहोचलं आहे. पुद्दुचेरीपासून ८० तर चेन्नईपासून ९० किलोमीटर अंतरावर असल्याचं हवामानशास्त्रविभागाने सांगितलं. आज रात्री तमिळनाडूच्या उत्तर किनारी भागात ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//